नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १९३ | Issue - 193 | वार शनिवार दि. ३० नोव्हेंबर २०२४ | Blow- Saturday Date 30 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### महायुतीची बैठक रद्द

मुंबई : मुख्यमंत्रिपदावरुन महायुतीमध्ये घडामोडींना वेग आला असतानाच महायुतीची आज होणारी बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. यामुळे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज त्यांचे मूळगाव असलेल्या सातारा जिल्ह्यातील दरे या गावी जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच भाजपा गटनेता निवड झाल्यानंतर महायुतीची बैठक होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. काल केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या निवासस्थानी महायुतीमधील नेत्यांची बैठक झाली. या बैठकीसाठी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या बैठकीत मुख्यमंत्री कोण आणि सत्तेच्या वाटाघाटीचा तिढा सुटलेला नाही. या बैठकीत सरकार स्थापने संदर्भात शाह यांनी सूचना दिल्या आहेत.

यानंतर आज एकनाथ शिंदे, अजित पवार, देवेंद्र फडणवीस या तिनही नेत्यांची मुंबईत महायुतीची बैठक होणार होती. पण, अचानक ही बैठक रद्द करण्यात आली आहे.

# देशाचा आर्थिक विकासदर घसरला

## 'जीडीपी'ची नीचांकी घसरण; दोन वर्षांतील सर्वात कमी ५.४ टक्के दर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशाचा आर्थिक विकासदर चालू आर्थिक वर्षाच्या जुलै–सप्टेंबर तिमाहीत दोन वर्षांच्या नीचांकी ५.४ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. मुख्यत: शहरी ग्राहकांची घटलेली मागणी आणि उत्पादन तसेच खाणकाम क्षेत्राच्या सुमार कामगिरीने अर्थव्यवस्थेची वाढ खुंटवणारा परिणाम केला आहे. मात्र तरीही सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था हे बिरुद देशाने कायम ठेवले आहे.

आर्थिक वर्ष २०२३–२४ मधील जुलै ते सप्टेंबर तिमाहीत सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) वाढ ८.१ टक्के राहिली होती. तर एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ६.८ टक्क्यांवर होता. तर शुक्रवारी जाहीर झालेल्या दुसऱ्या तिमाहीतील दर हा रिझर्व्ह बँकेच्या ७ टक्क्यांच्या अनुमानाच्या तुलनेत तब्बल दीड टक्क्यांहून अधिक मंदावल्याचे स्पष्ट होत आहे. या आधी सात तिमाहीं–पूर्वी म्हणजेच ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ मध्ये जीडीपी वाढीचा ४.३ टक्क्यांचा नीचांक नोंदवला गेला होता.

राष्ट्रीय सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार, कृषी क्षेत्राचे वाढीचा वेग (सकल मूल्यवर्धन – ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड) वर्षापूर्वीच्या १.७ टक्क्यांवरून सरलेल्या जुलै–सप्टेंबर तिमाहीत दुपटीने वाढून ३.५ टक्क्यांवर पोहोचले आहे. तर उत्पादन क्षेत्राची कामगिरी सुमार राहिली असून दुसऱ्या तिमाहीत विकासवेग २.२ टक्क्यांवर आक्रसला आहे. जो मागील वर्षीच्या कालावधीत १४.३ टक्के असा वेगवान राहिला होता. बरोबरीने खाण आणि उत्खनन क्षेत्रातील कामगिरी गेल्यावर्षी सप्टेंबर तिमाहीअखेर ११.१ टक्के अशी दुहेरी अंकात राहिली होती. त्यातुलनेत ती यंदाच्या सप्टेंबर तिमाहीत जेमतेम शून्याच्या वर, म्हणजेच ०.०१ टक्क्यांवर घसरली आहे.

अर्थव्यवस्थेसाठी दिलासा म्हणजे सेवा क्षेत्रांतील, वित्त, गृह निर्माण आणि व्यावसायिक सेवांच्या वाढीचा दर तिमाहीत ६.७ टक्के राहिला, जो मागील वर्षीच्या याच तिमाहीत ६.२ टक्के होता. त्या उलट वीज, गॅस, पाणी पुरवठा आणि इतर उपयुक्तता सेवांमध्ये ३.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे, ज्यात वर्षापूर्वीच्या १०.५ टक्क्यांच्या तुलनेत निम्म्याहून अधिक घट झाली आहे. बांधकाम क्षेत्राने दुसऱ्या तिमाहीत ७.७ टक्के वाढ नोंदवली, जी गतवर्षातील याच तिमाहीतील १३.६ टक्क्यांवरून लक्षणीय घरंगळली आहे.

खरीपाच्या उत्पादनांत भरघोस वाढ आणि भरलेल्या जलाशयांमुळे रब्बी पिकांच्या हंगामाबद्दलही आशा आहेत. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था व मागणीत सुधारणा अपेक्षित आहे. शिल्लक महिन्यांमध्ये सरकारचा भांडवली खर्च वाढल्यास, उत्तरार्धात जीपीडी वाढीला गती मिळू शकेल. परिणामी संपूर्ण वर्षासाठी ६.५ टक्के ते ६.७ टक्क्यांचा विकासदर गाठला जाईल, असे अदिती नायर, मुख्य अर्थतज्ज्ञ, इक्रा म्हणाल्या.

जीडीपी वाढ ५.४ टक्क्यांवर खुंटणे हे एक कमालीचे नकारात्मक आणि मंदीचे प्रमाण अपेक्षेपेक्षा खूपच तीव्र असल्याचे दर्शवते. केंद्र आणि राज्यांचा एकत्रित भांडवली खर्च पहिल्या सहामाहीत अनुक्रमे १५ टक्के आणि ११ टक्क्यांनी घसरला आहे. खासगी क्षेत्रा–तून गुंतवणूक घटली असताना, सरकारचा भांडवली खर्च हा अर्थव्यवस्थेच्या वाढीला आतापर्यंत आधार होतो, पण तोही ढळताना दिसत आहे.– रजनी सिन्हा, मुख्य अर्थतज्ज्ञ, केअरएज रेटिंग्ज यांनी सांगितले.

# शाही मशीद सर्वेक्षणास स्थगिती, संभल हिंसाचार; उत्तर प्रदेश सरकारला शांतता राखण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशातील चंदौसी येथील मुघलकालीन शाही जामा मशिदीच्या सर्वेक्षण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती देण्याचे निर्देश कनिष्ठ न्यायालयाला देतानाच हिंसाचारग्रस्त संभल शहरात शांतता राखण्याचे आदेश सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकारला दिले.

संभलच्या दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ विभाग) यांच्या न्यायालयाने १९ नोव्हेंबर रोजी हिंदू पक्षकारांच्या याचिकेवर विचार करून मशिदीचे सर्वेक्षण 'अधिवक्ता कमिशन'कडून करण्याचा एकतर्फी आदेश दिला होता. सुनावणीवेळी संभल दिवाणी न्यायालयाद्वारे नियुक्त कमिश्नर राकेश सिंह राघव यांना मशीद सर्वेक्षणावरील अहवाल १० दिवसांत सादर करण्याचे निर्देश दिले. कनिष्ठ न्यायालयाने सर्वेक्षणाचे आदेश दिल्यानंतर २४ नोव्हेंबर रोजी या भागात हिंसाचार उसळला होता, ज्यात चार जणांना आपला जीव गमवावा लागला.



हे प्रकरण ८ जानेवारी २०२५ रोजी ट्रायल कोर्टासमोर सूचिबद्ध करण्यात आले असून जोपर्यंत हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रविष्ट होत नाही तोपर्यंत ट्रायल कोर्ट या प्रकरणात पुढील कारवाई करणार नाही. खटल्याच्या गुणवत्तेवर कोणतेही मत व्यक्त केलेले नाही तसेच विशेष परवानगी याचिकेचा निपटारादेखील करणार नाही, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

शांतता समिती स्थापन करण्याचे आदेश

खंडपीठाने राज्य सरकारला दोन्ही समुदायांच्या सदस्यांचा समावेश असलेली शांतता समिती स्थापन करण्याचेही आदेश दिले. संभलच्या शाही जामा मशिदीच्या व्यवस्थापन समितीने २८ नोव्हेंबर रोजी सुप्रीम कोर्टात धाव घेतली आणि मुघलकालीन मशिदीचे सर्वेक्षण करण्याच्या जिल्हा न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले आहे.

कोणतीही अप्रिय घटना घडू नये अशी आमची इच्छा आहे. पूर्णपणे तटस्थ राहायला हवे आणि कोणतीही चूक होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. जर कोणतीही पुनरावृत्ती याचिका/संकीर्ण याचिका दाखल केली गेली तर ती तीन कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीत सूचीबद्ध केली जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले आहे.

# गोंदियात 'शिवशाही' बस उलटून ११ जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : भंडाऱ्यावरून गोंदियाला जाणारी एसटी महामंडळाची भरधाव शिवशाही बस शुक्रवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास खजरी–डव्वा गावाजवळ उलटली. यानंतर ही बस सुमारे वीस फूट अंतरापर्यंत घासत गेली. या भीषण अपघातात ११ प्रवासी ठार, तर २९ जखमी झाले. यापैकी दहा प्रवाशांची प्रकृती गंभीर आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे.





भंडारा–गोंदिया ही लाखनी, साकोलीमार्गे जाणारी शिवशाही बस ४० प्रवासी घेऊन निघाली. सडक अर्जुनी–गोंदिया मार्गावरून जात असताना खजरी–डव्वा गावाजवळ दुचाकीला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नांत बसचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस उलटली. या धक्क्याने बसमधील काही प्रवासी बाहेर फेकले गेले. यामध्ये ११ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. जखमी प्रवाशांचा आक्रोश कानी पडताच शेजारच्या शेतात काम करीत असलेले शेतकरी आणि शेतमजूर मदतीसाठी धावून आले. यानंतर संपूर्ण गावच घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. रुग्णवाहिकांच्या मदतीने जखमींना तातडीने गोंदियाच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही किरकोळ जखमींवर गोरेगाव ग्रामीण रुग्णालय आणि डव्वा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले. अपघातानंतर बसचालक प्रणय रायपूरकर याने घटनास्थळावरून पळ काढला. अपघाताच्या नेमक्या कारणाचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. या अपघातानंतर गोंदिया–कोहमारा मार्गावरील वाहतूक काही काळ बंद पडली होती.

### अपघातात २९ जखमी, १० गंभीर; मृतांच्या कुटुंबियांना मदत


मृतांच्या कुटुंबीयांना एसटी महामंडळामार्फत दहा लाख रुपयांची मदत देण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली. शिंदे यांनी गोंदियाच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून अपघातासंदर्भात माहिती घेतली. 'अपघातातील सर्व जखमींना त्वरित उपचार मिळावेत, शासकीय खर्चातून उपचार करावेत,' अशा सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'एक्स'वरून शोकसंवेदना व्यक्त केल्या. 'जखमींना खासगी रुग्णालयात उपचार द्यावे लागले, तरी तातडीने द्या. आवश्यकता भासल्यास नागपूरला पाठवा,' अशा सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केल्या.

गोंदिया–कोहमारा या राज्य मार्गाच्या रुंदीकरणाला सुमारे तीन वर्षांपूर्वी मंजुरी मिळाली. पण, वन व वन्यजीव कायद्यात काम अडकल्याने रस्त्याचे रुंदीकरण थांबले. परिणामी गोंदिया–मुंडीपारपर्यंत या मार्गाचे रुंदीकरण झाले असले, तरी पुढे कोहमारापर्यंत मार्ग अरुंद आहे. या मार्गावर सतत अपघात होतात.

दहा प्रवाशांची प्रकृती गंभीर

या अपघातात २९ प्रवासी जखमी झाले आहेत. दहांची प्रकृती गंभीर आहे. यामध्ये नैतिक प्रकाश चौधरी (०८) रा. कामठी (नागपूर), श्रीकृष्ण रामदास उके (४७) रा. कोसंबी (भंडारा), शारदा अशोक चव्हाण (६३) रा. नागपूर, पल्लवी प्रकाश चौधरी (३३) रा. कामठी (नागपूर), लक्ष्मी धनराज भाजीपाले (३३) रा. गोंदिया, स्वप्नील सुभाष हेमणे (४०) रा. नागपूर, विद्या प्रमोद मडेकरी (६३) रा. नागपूर, भार्गवी राजेश कडू (१५) रा. नागपूर, धृविका स्वप्नील हेमणे (०६) रा. नागपूर, टिना यशवंत दिघे (१७) रा. सोमलपूर यांचा समावेश आहे. इतर १९ प्रवाशांवर उपचार करून सुट्टी देण्यात आली.

# एकनाथ शिंदे शनिवारी घेणार मोठा निर्णय, भाजपचे टेन्शन वाढणार



छत्रपती संभाजीनगर : राज्यात जनतेने महायुतीला मोठा कौल दिला आहे. आता महाराष्ट्राचा कारभारी कोण? हा प्रश्न अवघ्या जनतेला पडला आहे. यातच सत्तास्थापनेच्या चर्चांचे गुऱ्हाळ आता सुरु आहे. तरी अद्याप अधिकृत माहिती समोर आली आहे. गुरुवारी अमित शहांच्या निवासस्थानी बैठक पार पडल्यानंतर मुख्यमंत्री नेमका कोण या प्रश्नाला आणखी धार चढली आहे. अशातच शिवसेनेचे नवनिर्वाचित आमदार संजय शिरसाट यांनी मोठे विधान केले आहे. यामुळे आता भाजपचे टेन्शन वाढणार आहे. शिरसाट म्हणाले की, 'एकनाथ शिंदे शनिवारी सायंकाळी मोठा निर्णय घेणार आहेत.'

राज्याच्या काळजीवाहू मुख्यमंत्र्यांनी गुरुवारी अमित शाह यांच्यासोबत पार पडलेल्या बैठकीनंतर शुक्रवारी थेट साताऱ्यातील (पान २ वर....)

## कॉँग्रेस कार्यकारी समितीची बैठक

### आपापसांतील भांडणांमुळे कॉँग्रेसचा पराभव

# कॉँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडून नेत्यांची खरडपट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'तुम्ही एकदिलाने हरियाणा आणि महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका लढल्या नाहीत. तुम्ही एकमेकांविरोधात जाहीर आरोप–प्रत्यारोप करत राहिलात. आपापसांतील भांडणांमुळे कॉँग्रेसचा पराभव झाला. वातावरण आपल्या बाजूने होते तरीही त्याचा लाभ तुम्हाला घेता आला नाही', अशी खरडपट्टी कॉँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शुक्रवारी कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये काढली. पण, दोन्ही राज्यांतील पराभवाबद्दल प्रदेश नेत्यांविरोधात कोणती कारवाई केली जाईल, याबाबत खरगेंनी बैठकीमध्ये मौन बाळगले.

हरियाणातील पराभवामागे भूपेंद्र हुड्डा, कुमारी सैलजा, रणदीप सुरजेवाला यांच्यामधील संघर्ष कारणीभूत असल्याचे मानले गेले. महाराष्ट्रामध्येही प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विजय वडेट्टीवार आदी काही नेत्यांमध्ये ताळमेळ नसल्याची चर्चा होत होती. खरगेंनी कोणत्याही नेत्याचे नाव घेतले नसले तरी, 'निवडणुका जिंकण्यासाठी तुम्ही राष्ट्रीय नेत्यांवर किती काळ अवलंबून राहणार', असा थेट प्रश्न करत कॉँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांना जाब विचारला.




'तुमच्यामध्ये एकी नाही, नेत्यांच्या अंतर्गत संघर्षामुळे संघटना कमकुवत झाली आहे, प्रदेश स्तरावर संघटनेने अपेक्षित काम केलेले नाही, असे असेल तर निवडणुका कशा जिंकणार? संघटना मजबूत असेल तर पक्ष जिंकेल आणि पक्ष जिंकला तरच तुम्हीही टिकाल', असे खडेबोल खरगेंनी सुनावले. 'आपणच आपले शत्रू बनलो आहोत. आपण नकारात्मक गोष्टी बोलू लागलो आहोत, आपल्यामध्ये नैराश्य आले आहे. निवडणूक जिंकण्यासाठी आपल्याकडे 'नेरेटिव्ह' असे आपण बोलू लागलो आहोत पण, भाजपविरोधात नेरेटिव्ह तयार करण्याची जबाबदारी कोणाची आहे', असा सवाल खरगेंनी केला.

'राष्ट्रीय मुद्दे आणि राष्ट्रीय नेत्यांच्या आधारावर किती दिवस तुम्ही निवडणूक लढवणार? बेरोजगारी, महागाई, आर्थिक विषमता असे ज्वलंत प्रश्न होते. जातनिहाय जनगणनेचाही मुद्दा होता. पण, केवळ राष्ट्रीय मुद्द्यावर निवडणूक लढवता येत नाहीत. राज्यांचे स्थानिक मुद्दे काय आहेत, याकडे लक्ष देण्याची गरज होती. वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळे मुद्दे–समस्या असतात, ते समजून घेऊन त्यासंदर्भात प्रचाराची रणनीती आखण्याची गरज होती. पण, यापैकी प्रदेश नेत्यांनी काहीही केले नाही, अशी चपराक खरगेंनी लगावली. या बैठकीमध्ये राहुल गांधीही उपस्थित होते.

निवडणुका जिंकायच्या असतील तर कॉँग्रेसला बुथस्तरावर काम करावे लागेल. निवडणुकीआधी किमान एक वर्ष नेत्यांनी–कार्यकर्त्यांनी कामाला लागले पाहिजे. बुथस्तरावर संघटना मजबूत करावी लागेल. मतदार यादी तयार करण्यापासून मतमोजणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर सतर्क राहावे लागेल. निवडणूक लढण्याची पद्धत कॉँग्रेसला बदलावी लागेल. भाजपप्रमाणे सुक्ष्म संवादाचे तंत्र शिकले पाहिजे. भाजपच्या गैरप्रचाराविरोधात लढण्याचे नवे मार्ग शोधावे लागतील, अशी आक्रमक भूमिका खरगेंनी घेतली.

महाराष्ट्र आणि हरियाणामधील निवडणुकीत वातावरण कॉँग्रेससाठी अनुकूल होते. पण केवळ वातावरण अनुकूल असल्यामुळे विजय मिळत नाही, त्याचे मतांमध्ये रुपांतर करावे लागते, हा फायदा कॉँग्रेसला करून घेता आला नाही, असेही खरगे म्हणाले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### वाढ खुंटवणारा निच्चांक

आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील जुलै ते सप्टेंबर तिमाहीत सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) वाढ ८.१ टक्के राहिली होती. तर एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ६.८ टक्क्यांवर होता. तर शुक्रवारी जाहीर झालेल्या दुसऱ्या तिमाहीतील दर हा रिझर्व्ह बँकेच्या ७ टक्क्यांच्या अनुमानाच्या तुलनेत तब्बल दीड टक्क्यांहून अधिक मंदावल्याचे स्पष्ट होत आहे. या आधी सात तिमाहीं-पूर्वी म्हणजेच ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ मध्ये जीडीपी वाढीचा ४.३ टक्क्यांचा नीचांक नोंदवला गेला होता. राष्ट्रीय सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार, कृषी क्षेत्राचे वाढीचा वेग (सकल मूल्यवर्धन - ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड) वर्षापूर्वीच्या १.७ टक्क्यांवरून सरलेल्या जुलै-सप्टेंबर तिमाहीत दुपटीने वाढून ३.५ टक्क्यांवर पोहोचले आहे. तर उत्पादन क्षेत्राची कामगिरी सुमार राहिली असून दुसऱ्या तिमाहीत विकासवेग २.२ टक्क्यांवर आक्रसला आहे. जो मागील वर्षीच्या कालावधीत १४.३ टक्के असा वेगवान राहिला होता. बरोबरीने खाण आणि उत्खनन क्षेत्रातील कामगिरी गेल्यावर्षी सप्टेंबर तिमाहीअखेर ११.१ टक्के अशी दुहेरी अंकात राहिली होती. त्यातुलनेत ती यंदाच्या सप्टेंबर तिमाहीत जेमतेम शून्याच्या वर, म्हणजेच ०.०१ टक्क्यांवर घसरली आहे. अर्थव्यवस्थेसाठी दिलासा म्हणजे सेवा क्षेत्रांतील, वित्त, गृह निर्माण आणि व्यावसायिक सेवांच्या वाढीचा दर तिमाहीत ६.७ टक्के राहिला, जो मागील वर्षीच्या याच तिमाहीत ६.२ टक्के होता. त्या उलट वीज, गॅस, पाणी पुरवठा आणि इतर उपयुक्तता सेवांमध्ये ३.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे, ज्यात वर्षापूर्वीच्या १०.५ टक्क्यांच्या तुलनेत निम्म्याहून अधिक घट झाली आहे. बांधकाम क्षेत्राने दुसऱ्या तिमाहीत ७.७ टक्के वाढ नोंदवली, जी गतवर्षातील याच तिमाहीतील १३.६ टक्क्यांवरून लक्षणीय घरंगळली आहे. देशाचा आर्थिक विकासदर चालू आर्थिक वर्षाच्या जुलै-सप्टेंबर तिमाहीत दोन वर्षांच्या नीचांकी ५.४ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. मुख्यत: शहरी ग्राहकांची घटलेली मागणी आणि उत्पादन तसेच खाणकाम क्षेत्राच्या सुमार कामगिरीने अर्थव्यवस्थेची वाढ खुंटवणारा परिणाम केला आहे. मात्र तरीही सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था हे बिरुद देशाने कायम ठेवले आहे. खरीपाच्या उत्पादनांत भरघोस वाढ आणि भरलेल्या जलाशयांमुळे रब्बी पिकांच्या हंगामाबद्दलही आशा आहेत. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था व मागणीत सुधारणा अपेक्षित आहे. शिल्लक महिन्यांमध्ये सरकारचा भांडवली खर्च वाढल्यास, उत्तरार्धात जीपीडी वाढीला गती मिळू शकेल.

# प्रधानमंत्री आवास योजना : सामाजिक कल्याण कार्यक्रम




ग्रामीण भारतापुढे गृहनिर्माण हे मूलभूत आव्हान आहे. ग्रामीण भागा-तील बरीचशी कुटुंबे माती, बांबू किंवा इतर तकलादू साहित्यापासून बनवलेल्या कच्च्या घरांमध्ये राहतात. यामुळे या कुटुंबांना प्रतिकूल हवामानात धोकादायक नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागू शकते. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (झचध-ऋ) द्वारे या समस्येचे निराकरण करण्यासाठी, भारत सरकार काम करत आहे. ही योजना म्हणजे, सर्वांसाठी घरे प्रदान करण्यावर भर देणारा एक महाकाय सामाजिक कल्याण कार्यक्रम आहे. सर्व बेघर कुटुंबांना आणि कच्च्या बांधणीच्या, तसेच मोडकळीस आलेल्या घरांमध्ये राहणाऱ्या ग्रामीण कुटुंबांना-टिकाऊ, प्रतिकूल हवामानातही तग धरू शकणारी आणि अत्यावश्यक सुविधांनी सुसज्ज असलेली पक्की घरे बांधण्यासाठी आर्थिक आणि बांधकामविषयक सहाय्य प्रदान करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. झच-ध-ऋ ची प्रगती प्रशंसनीय आहे. ग्रामीण विकास मंत्रालयानुसार (चठऊ-मिनिस्ट्री ऑफ रुरल डेव्हलपमेंट) ऑक्टोबर २०२४ पर्यंत २ कोटी ६७ लाख घरे बांधण्यात आली आहेत. सर्वांसाठी गृहनिर्माण ही संकल्पना खरोखरच वास्तव ठरू शकते का? ग्रामीण भागातील गृहनिर्माणा सम ोरची आव्हाने, झचध-ऋ ही योजना किती प्रभावीपणे हाताळते?

झचध-ऋ ने बांधकामाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि लाभ वितरणावर लक्ष ठेवण्यासाठी, तंत्रज्ञानाचा उपयोग केला आहे. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण (ठचढ) कार्यक्रम, हा बांधकामाचा दर्जा सुधारण्यातील, झचध-ऋ चा एक महत्त्वाचा घटक आहे. या कार्यक्रमाने, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या सहकार्याने, २ लाख ८१ हजार गवंडी प्रशिक्षित केले आहेत. स्थानिक कारागिरांचे कौशल्य विकसित करून ते उपयोगात आणत असतानाच, बांधकामाचा दर्जाही चांगला राखला जाईल अशा पद्धतीने या गवंड्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. दर्जा सुधारत असताना, या स्थानिक-तज्ज्ञ वापरण्याच्या पद्धतीमुळे, झचध-ऋ अंतर्गत नवीन उपक्रम वेगा-ने राबवण्यात मदत झाली आहे. नवीन गृहनिर्माण उपक्रमांनी २०२१-२२ मध्ये ४० लाखांचा टप्पा ओलांडला आहे आणि २०२२-२३ मध्ये ५० लाखांचा आकडा पार करत मागील सर्व विक्रम मोडले आहेत, हा याचा उत्तम दाखला आहे. अलीकडील संशोधनात असे आढळले आहे की झचध-ऋ ने घरांची अवस्था, पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि एकूणच कल्याणकारक बाबींमध्ये वाढ करून अनेक अंगांनी लाभार्थींचे जीवन लक्षणीयरीत्या सुधारले आहे. सामाजिक स्थिती, स्वाभिमान आणि आपलेपणाच्या-सुरक्षिततेच्या भावनेत लक्षणीय सुधारणांची नोंद झाली आहे. आपुलकीची भावना वाढीस लागल्यामुळे कदाचित त्रासदायक स्थलांतर देखील कमी होत आहे. उपेक्षित गटांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देणे, पारदर्शकतेला प्राधान्य, महिलांना सह-म ालकी हक्क आणि त्याद्वारे लोकसंख्येतील या घटकांचे सक्षमीकरण याला प्राधान्य देण्यावर, झचध-ऋ चा मुख्य भर आहे. २०१६ पासून या कार्यक्रमाने ८१ कुशल, ७१ अर्ध-कुशल आणि १६४ अकुशल व्यक्ती-दिवसांसह, प्रति घर अंदाजे ३१४ व्यक्ती-दिवस काम निर्माण करून, मनरेगाद्वारे रोजगार निर्मितीवर महत्त्वपूर्ण परिणाम साधला आहे.

ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम उच्च दर्जाचाही आहे आणि काही कुशल प्रमाणित गवंड्यांना बांधकाम क्षेत्रात परदेशात काम करण्याची संधी देखील मिळत आहे. आपत्तींमध्ये तग धरू शकतील अशा बांधकामांच्या रचनांना, पहल कॉम्पेंडियम सारख्या उपक्रमांचे पाठबळ आहे. 'पहल कॉम्पेंडियम' (प्रत्यक्ष हस्तांतरित लाभ-पहलविषयक माहितीचा सारसंक्षिप्त संग्रह) सारखा उपक्रम, स्थानिक परिस्थिती आणि स्थानिय उपलब्ध सामग्रीवर आधारित आपत्ती प्रतिरोधक वैशिष्ट्यांसह वैविध्यपूर्ण घर रचना वर्गीकरण व्यवस्था (टायपोलॉजी) प्रदान करतो. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमात गुणवत्तेवर भर कसा दिला जातो, या वस्तुस्थितीचे हे उत्तम निदर्शक आहे. 'पहल कॉम्पेंडिअम' एका पवर उपलब्ध आहे आणि त्याद्वारे शिफारस झालेल्या आदर्श त्रिमितीय घर रचना उपलब्ध होतात. तंत्रज्ञानाच्या वा-पराने, दोन प्रमुख माध्यमांद्वारे लाभार्थींचे जीवन सुधारणाऱ्या झचध-ऋ च्या यशात योगदान दिले आहे. ही दोन माध्यमे आ-हेत. सुधारित पर्यवेक्षण आणि मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे एकत्रीकरण-सम न्वयन. कार्यक्रम एकत्रीकरणामुळे, शौचालये (डइच्- स्वच्छ भारत मिशन), डझऋ (द्रवरूप पेट्रोलियम वायू) जोडण्या (झचणध-प्रधानमंत्री उज्ज्वला योजना), नळाद्वारे पिण्याच्या पाण्याची तरतूद (जलजीवन मिशन), वीज जोडण्या (सौभाग्य), स्वच्छ ऊर्जा उपाय आणि इतर महत्त्वाच्या सुविधा, याबाबतच्या इतर सरकारी उपक्रमांसह, झचध-ऋ राबवून लाभार्थींना वेगवेगळ्या प्रकारच्या अत्यावश्यक सेवा उपलब्ध होतात. यामुळे लाभार्थींच्या जीवनाचा एकूण दर्जा उंचावतो. अशाप्रकारे, झचध-ऋ चा भर केवळ घरांची संख्या वाढवण्यापेक्षा नागरिकांचे जीवन सुधारण्याकडे आहे हे एक स्वागतार्ह धोरण वैशिष्ट्य आहे.

पारदर्शकता आणि नि:पक्षपातीपणा राखण्यात सुधारित पर्यवेक्षणाने देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. घरापासून कोण वंचित राहू शकते या निकषांचे अनुसरण करून, ग्रामसभा आणि अपील प्रक्रियेद्वारे शहानिशा करत, डएउउ (सामाजिक आर्थिक आणि जात जनगणना) २०११ आणि आ-वास + २०१८ याद्यांमधून लाभार्थी कोण असतील हे ठरवले जाते. शिवाय, 'ारी+ यादी', मोबाईल प 'ारी+२०२४' द्वारे केलेल्या सर्वेक्षणाचा वापर करून अद्ययावत केली जाते, जी घरांना स्वयंसर्वेक्षणाचा पर्याय देखील प्रदान करते. अलीकडे, पर्यवेक्षणामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी चेहऱ्यावरून आ-ोळख पक्की करणाऱ्या प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे. दर्जेदार प्रमाणाम ुळे, झचध-ऋ पुढे विकसनशील जगातील अशा प्रकारची इतर गृहनिर्माण धोरणे खुजी ठरतात. झचध-ऋ चे, २०२९ पर्यंत अतिरिक्त २ कोटी घरांच्या बांधकामाला पाठबळ देण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट आहे. वानगीदाखल, ब्राझीलच्या माय हाऊस, माय लाइफ कार्यक्रमाने (ब्राझील सरकार) २०२१ पर्यंत फक्त ६० लाख घरांचे वाटप केले आहे किंवा करार केले आहेत आणि दक्षिण आफ्रिकेच्या पुनर्रचना आणि पुनर्विकास कार्यक्रमाने १९९४ पासून २००१ पर्यंत, अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी केवळ ११ लाख घरे बांधली (टॉम लॉज, २००३). झच-ऋ चे प्रमाण आणि व्याप्ती यामुळे ही योजना, जागतिक स्तरावर सर्वात प्रभावी गृहनिर्माण उपक्रमांमध्ये स्थान मिळवते.

सध्याचे संशोधन असे दर्शविते की झच-ऋ ही योजना एकंदरीत यशस्वी ठरली आहे. हे संशोधन, भविष्यात कुठल्या क्षेत्रांमध्ये सुधारणेला वाव आहे यावर प्रकाश टाकते. प्रथम, ज्यांना कार्यक्रमाची सर्वात जास्त गरज आहे त्यांच्यापर्यंत हा कार्यक्रम पोहोचेल याची खात्री करण्यासाठी, पात्रता निकषांबद्दल माहितीची उपलब्धता वाढवली जाऊ शकते. यामुळे जागरूकता वाढायला म दत मिळून लाभार्थींचा व्यापक सहभाग निश्चित होईल. दुसरे, धोरणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी, लाभार्थींकडून येण-ारे अभिप्रायांचे मार्ग वाढवणे, सुधारणे, धोरणकर्त्यांच्या दृष्टिकोनातील संभाव्य कमजोर स्थळे-त्रुटी दूर करणे, आवश्यक आहे. शेवटी, राज्या-राज्यांमध्ये गृहनिम ाण उपक्रमांच्या वाटपात लक्षणीय फरक आहे. काही राज्यांनी त्यांचे उद्दिष्ट गाठले आहे किंवा ओलांडले आहे तर काहींनी सुरुवातही केलेली नाही. झच-ऋ ने केवळ गृहनिर्माणाची हमी देण्याचेच नाही, तर लाभार्थींसाठी अतिरिक्त विविध प्रकारचे लाभ मिळवून देण्याची हमी देण्याचे वचनही दिले आहे, ज्यामुळे त्यांच्या जीवनाचा दर्जा लक्षणीयरीत्या सुधारू शकेल. सर्व राज्यांमध्ये झच-ऋ लागू करण्यासाठी व्यापक राजकीय सहमतीमुळे, सर्वांसाठी गृहनिर्माण (घरे) हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संपूर्ण भार-तात साधनसंपत्तीचे अधिक संतुलित आणि परिणामकारक वाटप पक्के करता येऊ शकते.

## एकनाथ शिंदे शनिवारी घेणार मोठा निर्णय, भाजपचे टेन्शन वाढणार

(पान १ वरून..) दरेगाव गाठले. यासाठी त्यांनी आजच्या तसेच पुढील दोन दिवसांच्या सर्व नियोजित बैठका रद्द केल्या आहेत. दिल्लीहून परतल्यानंतर शिंदेंनी थेट आपलं दरेगाव गाठल्याने विविध चर्चांना उधाण आलं आहे. यामुळे मुख्यमंत्रीपदावरुन महायुतीत काही आलबेल नसल्याची चिन्ह दिसत आहेत.

एएनआय वृत्तसंस्थेला माहिती देताना संजय शिरसाट म्हणाले की, काही राजकीय पेचाची परिस्थिती असेल तर एकनाथ शिंदे थेट त्यांच्या गावी जातात. ते अशावेळी गावी जाण्याला प्राधान्य देतात.दरेगावी गेल्यानंतर त्यांच्याशी संपर्क होत नाही. त्यांचा मोबाईल फोनही नाही. कधीही त्यांना काही मोठा निर्णय घ्यायचा असेल तर नेहमी दरेगावी पोहोचले आहेत. ते उद्या (शनिवारी) सायंकाळपर्यंत मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहेत. महायुतीत घडणाऱ्या घडामोडी पाहता यावर ते नक्कीच निर्णय घेतील.

काळजीवाहू मुख्यमंत्री अचानक आपल्या मूळ गावी गेल्याने सलग दोन दिवसांतील नियोजित बैठका रद्द करण्यात आल्या आहेत. निकाल जाहीर होऊन आठवडा झाला असून अद्याप मुख्यमंत्रीपदावर अधिकृत शिक्कामोर्तब झालेला नाही. आता थेट रविवारी मुंबईत महायुतीची बैठक पार पडणार आहे. त्यानंतर निर्णय झाल्यास ५ डिसेंबर शपथविधीचा कार्यक्रम अपेक्षित आहे. तोपर्यंत सत्तास्थापनेचा विषय बारगळणार आहे.

दरम्यान, संजय शिरसाटांच्या आधी उदय सामंतांनी शिंदेंच्या दरेगावी जाण्यामागे काही मोठे कारण नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, शिंदे नाराज नाहीत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची तब्येत बरी नाही. त्यांना ताप देखील होता त्यांना सर्दी देखील झाली आहे. असे असताना ते नाराज आहेत म्हणून दरे गावाला गेले, असे सांगणे हे चुकीचे ठरू शकते. किंबहुना, गुरुवारी रात्री नवी दिल्लीत पत्रकारांशी बोल-ताना शिंदे म्हणाले की, केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांच्याशी सत्ता स्थापनेबाबत सकारात्मक चर्चा झालेली आहे. चर्चेची पुढील फेरी रविवारी मुंबईत होणार आहे.



## महापुरुषांचे विचार आचरणात आणले पाहिजेत : सुनिल वारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनीधी : क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले हे दृष्टे समाज सुधारक होते . त्यांनी स्त्रियांसाठी पहिली शाळा सुरू केली.तसेच अस्पश्यासाठी पिण्याचा पाण्याचा हौद खुला केला. शेतकऱ्यांचे दुःख हंटर कमिशन पुढे मांडले अनिष्ट रूढी प्रथा परंपरेविरूद लढा उभा केला.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना गुरुस्थानी मानले. महापुरुष हे कोणत्याही एका जातीचे नसून त्यांनी मानवतेच्या कल्याणासाठी कार्य केले आहे. महापुरुषांचे विचार आपण आ-चरणात आणले पाहिजेत असे मत बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी बोलताना व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी) पुणे येथे महात्मा जोतिराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मा महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलतांना मा महासंचालक म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित द प्रॉब्लेम ऑफ रुपी या ऐतिहासिक ग्रंथाच्या शताब्दी वर्षानिमित्त बार्टी तर्फे आंतरराष्ट्रीय परिषद घेऊन देशाच्या अर्थव्यवस्थेत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे योगदानाला उजाळा दिला.

६ डिसेंबर - महापरिनिर्वाण दिन, १ जानेवारी - भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिनी आपण मोठ्या संख्येने एकत्र येऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करतो.

याप्रसंगी श्रीमती स्नेहल भोसले, इंदिरा अस्वार, वृषाली शिंदे , अनिल कारंडे, उमेश सोनवणे, रविन्द्र कदम यांच्यासह श्री सचिन जगदाळे, श्रीमती नसरिन तांबोळी, सुमेध थोरात बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उप-स्थित होते. सुत्रसंचलन श्री रामदास लोखंडे यांनी केले. आभार श्रीमती वैशाली खांडेकर यांनी मानले.

## पुढील लक्ष्य महापालिका, भाजपकडून तयारी सुरु, महायुतीसाठी 'मिशन १५०' चे उद्दिष्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेले यश पाहता, मुंबई महापालिका निवडणुका नववर्षाच्या सुरुव-ातीला होण्याची शक्यता आहे. भाजपकडून तयारीसाठी बैठकांचे सत्र सुरू झाले आहेत. महापालिका निवडणुकीत महायुतीला १५० जागा मिळवण्याचे उद्दिष्ट भाजपने ठेवले आहे. तर शिंदे यांच्या शिवसेनेने मात्र मंत्रिमंडळाच्या घोषणेनंतरच महापालिका निवडणुकांची रणन-ीती आखणार असल्याचे स्पष्ट केले आहे. शिवसेना (उबाठा) पक्षा-नेही आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. मात्र नवीन सरकारच्या स्थापनेनंतरच महाविकास आघाडीदेखील निवडणुकांची रणनीती ठरवणार आहे. मुंबई महापालिका निवडणुका २०१७ मध्ये पार पडल्या. त्यानंतर मार्च २०२२मध्ये महापालिकेतील नगरसेवकांची मुदत संपली. त्यानंतर महापालिकेवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आली. फेब्रुवारी २०२२म ध्ये महापालिका निवडणुका होणे अपेक्षित होते. मात्र, प्रशासकीय राजवट कायम राहिली. मागील दोन अर्थसंकल्प प्रशासकांनीच सादर केले. वॉर्डस्तरावर नगरसे-ेवक नसल्याने कामांना गती मिळत नाही, अशी तक्रार करत महापालिका निवडणुका घेण्याची म ागणी लोकप्रतिनिधींकडून सातत्याने होत आहे. मात्र, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीला मिळा-लेले यश पाहता, पुढील वर्षात निवडणुका होण्याची शक्यता आहे. सध्या महायुतीला पोषक वातावरण असल्याने, महायुतीतील भाजप-ने महापालिका निवडणुकांसाठी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

महायुतीला गेल्या दोन निवडणुकांमध्ये मिळालेले यश पाहता, मुंबई महापालिका निवडणुकीत १५० पर्यंत जागा मिळवण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुंबई भाजपचे उपाध्यक्ष आणि महापालिकेतील माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी स्पष्ट केले. भाजपच्या माजी नगरसेवकांची विविध कामे जास्तीत जास्त म ुंबईकरांपर्यंत पोहोचवण्यासाठीही प्रयत्न केले जाणार असून त्यासाठीही नियोजन होत आहे.

दुसरीकडे, शिवसेनेने मात्र अद्याप महापालिकेसाठी रणन-ीती जाहीर केलेली नाही. 'नवीन सरकार, मंत्रिमंडळ अशी राज्याची घडी बसल्यानंतरच, महापालिका निवडणुकांच्या रणनीतीची विचार केला जाईल,' असे शिवसेनेच्या माजी नगरसेविका आणि प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी स्पष्ट केले.

## आ. मनोज कायंदे यांना मंत्रिमंडळात घ्या

**सामाजिक कार्यकर्ते संतोष दराडे यांची अजित दादा पवार यांच्याकडे मागणी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे : सिंदखेडराजा मतदार संघातील नवनियुक्त तरुण तडफदार आमदार पदी नियुक्ती झालेले आमदार मनोज देवानंद कायंदे यांना राष्ट्रवादीच्या गोटातून मंत्रीपदावर स्थान द्यावे अशी म ागणी

सिंदखेडराजा तालुक्यातील ओबीसी बांधवांनी तसेच सामाजिक कार्यकर्ते संतोष दराडे यांनी राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे ,

केलेल्या मेलद्वारे त्यांनी म्हटले आहे की सिंदखेडराजा हा प्रस्थापितांचा किल्ला २५ वर्षापासून बालेकिल्ला राहिलेला आहे तसेच दोन दिग्गज आजी माजी आम दारांना मांगे सारत मनोज कांयदे यांनी विजय प्राप्त केला आहे ' अशक्यप्राय विजय हा मनोज कांयदे यांनी प्राप्त करून दाखव-ला शिवाय ऐन वेळी उमेदवारी मिळाल्यानंतरही विजय मिळवला आहे ' विदर्भातून राष्ट्रवादीचे एकमेव आमदार म्हणून ओबीसी चेहरा म्हणून मनोज कायदे निवडून आले आहेत त्यामुळे त्यांना मंत्रिमंडळात घेण्यात यावी अशी मागणी होत आहे '

## सुपतगाव परिसरात शेतकऱ्यांचा ऊस लागवडीकडे कल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : तालुक्यातील सुपतगाव सह परिसरातील गेल्या म हिनाभरापासून नवीन ऊस लागवडीला सुरुवात झाली आहे. काही शेतकरी जुने पारंपरिक ऊस लागवड करत आहेत, तर काही शेतकरी ऊसाची नवीन सुधारित रोपे आणून त्याची लागवड करत असल्याचे दिसून येत आहे.

पाण्याची टंचाई लक्षात घेऊन गेल्या वर्षी अनेक शेतकऱ्यांनी क्षेत्र कमी केले होते. परंतु यावर्षी चांगला पाऊस झाल्याने व परिसरातील तलाव, विहीर बोअरला मुबलक पाणीसाठा असल्याने अनेक शेतकरी सोयाबीनच्या रिकाम्या झालेल्या रानावर मशागत करून नव्याने ऊस लागवड करण्याकडे कल वाढला आहे. चांगल्या व बारा महिने झालेल्या ऊसाचे बेणे व एक डोळा पद्धतीचे रोप नर्सरी मधून मागवून शेतकऱ्यांनी नवीन ऊस लागवडीला सुरुव-ात केलेली आहे. साधारणपणे एक रोप दोन रुपये तीस पैसे तर सुधारित वाण तीन रुपये पंचवीस पैशाला मिळत असून अनेक शेतकरी शिराळा, कोल्हापूर,पुणे ,सांगली, सातारा येथील नावाजलेल्या नर्सरी मध्ये ऊस रोपे बुकिंग करून मागवून घेत आहेत.

सुपतगाव परिसरात अंदाजे साडेचार ते पाच फूट सरी पाडण्याची पद्धत रूढ झाली आहे. या भागात ८६०३२, १००१,८००५ या वाणाची जास्त प्रमाणात लागवड होत



असल्याचे दिसून येतआहे .बेणे लागवडीसाठी शेतकरी एक डोळा ,दोन डोळे - तीन डोळा लागवडीची पद्धत अवलंबत आहेत. तर दोन ऊस लागवडीतील अंतर दीड फ ूट ठेवल्याने अधिक फुटवा व अधिक उत्पादन होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### चोरट्याने लंपास केला एक लाख दहा हजारांचा ऐवज

सोलापूर : शेळगी येथून घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत कपाटातील पंधरा ग्रॅम सोन्याचे कानातील पाच ग्रॅमचे बिलवर व दोन ग्रॅम लहान मुलांचे अंगठी असा एक लाख दहा हजार रुपये किमतीचा ऐवज २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच ते २८ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास चोरून येण्याची घटना घडली.याप्रकरणी प्रशांत शिवानंद माडयाळ (वय ४०, रा. प्लॉट नंबर ०४ बलदवा नगर शेळगी) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने पळविली दुचाकी

सोलापूर : चेतन हॉटेलच्या बाजूला लावलेली दुचाकी क्रमांक (एम एच १३ बी डी १८८६) ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २६ नोव्हेंबर रोजी साडेनऊ ते अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी हिरालाल शंकर पिसे (वय ४५, रा. ३१८ न्यू सुनील नगर, एमआयडीसी) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल भांगे हे करीत आहेत.

### हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी पळविली

सोलापूर : रविवार पेठ येथून १५ ते १६ नोव्हेंबर रोजी पांढर्या रंगाची टीव्हीएस ज्युपिटर क्रमांक एम एच १३ बी एम ७९४३ ही चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी सारिका महेश परांडकर (वय-२७, रा. घर नंबर १६/२५६ गाळा,रविवार पेठ) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल धुमाळ हे करीत आहेत.

### गर्दीचा फायदा घेत चोरट्याने मोबाईल पळविला

सोलापूर : नवी वेस पोलिस चौकीजवळ देवेंद्र कोठे यांच्या संपर्क कार्यालयासमोर गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने २५ हजार रुपये किमतीचा रेडमी कंपनीचा नोट १३ प्रो प्लस चोरून नेल्याची घटना २३ नोव्हेंबर रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी नवल नागराज चावडीमणी (वय-२२, रा. १६८/ए/१ प्लॉट नंबर ४४ वज्रेश्वरी नगर,अक्कलकोट रोड) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल चुंगे हे करीत आहेत.

# तालुक्यातील प्रत्येक निवडणूक ताकदीने लढवू : अनिल सावंत

## पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : उमेदवार म्हणून मी पराभवाची जबाबदारी स्वीकारतो व राष्ट्रवादीच्या आत्म चिंतन बैठकीत आणि सावंत यांचे वक्तव्य विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाची जबाबदारी उमेदवार म्हणून मी घेतो व कुठल्याही कार्यकर्ता कुठल्याही पदाधिकारी पक्ष कमी पडत असे मी म्हणणार नाही कुठल्याही सहकार कमी पडत नाही पक्षाने मला उमेदवारी दिली त्यामुळे मी जबाबदारी घेतली येणारा काळ हा राष्ट्रवादीचा आणि पवार साहेबांच्या पक्षाचा असेल अशी खात्री राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे उमेदवार अनिल सावंत यांनी कार्यकर्त्यांना दिली. यावेळी माझी पालकमंत्री प्राध्यापक लक्ष्मणराव ढोबळे रतनचंद सहा सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल शहा मंगळवेढा शहरात देखील चंद्रशेखर कोंडबरी आदी प्रमुख उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे मंगळवेढा येथे विचार मंथन बैठक संपन्न झाली. यावेळी प्राध्यापक लक्ष्मण ढोबळे राहुलच्या यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी पुढे बोलताना सावंत म्हणाले की लोकसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे जनता सोबत होती. तसेच जनतेची साथ यावेळी सुद्धा होती लोकांनी आपल्याला मतदान केलेले आहे दहापैकी सात आठ लोकांनी दुपारीला मतदान करणार असल्याचे लोक बोलत होते. विधानसभा निवडणुकीतील हा पराभव कसा झाला याबाबत अख्खा महाराष्ट्र पवार साहेबांचा पक्ष हा उद्धव ठाकरे साहेबांचा पक्ष संपवलेले हे कारस्थान आहे असे दिसले दोन्ही दिवसापूर्वी पक्षाची बैठक झाली. यावेळी पक्षाची नव्या जोमाने पुढे जाण्याचे सांगितले आहे. आज ते वातावरण दिसत आहे पुढील काळात नसेल आपल्याकडून हा निकाल डिस्काउंट घेतला आहे त्यांनी जिंकूनी आनंद साजरा केलेला नाही. आगामी निवडणूक आपण लढणार आहोत गावागावात आपण शाखेचे नियोजन करून आपल्याला सुखदुःखात अनिल सावंत भैरवनाथ सुवरच परिवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपल्या सोबत असेल असेही खात्री यावेळी सावंत यांनी अनिल सावंत भैरवनाथ शुगर परिवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपल्या सोबत असेल असेही खात्री यावेळी सावंत यांनी दिली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शेतकरी कट कर आणि बहुजन समाजाचा प्रश्नाच्या केंद्रस्थानी ठेवून त्या दृष्टिकोनातून पुरोगामी विचाराचा प्रसार व प्रचार करणारे स्त्री शिक्षणाचा पाया रचणारे, महान विचारवंत, थोर समाज सुधारक, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस सोलापूर शहराच्या वतीने राष्ट्रवादीचे शहर खजिनदार युवराज माने यांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यात पुष्पहार अर्पण करून अमर रहे अमर रहे महात्मा फुले अमर रहे क्या घटना देत विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, महिला अध्यक्ष संगीता ताई जो धनु कर, ज्येष्ठ नेते श्रीनिवास कोंडी सर, ज्येष्ठ नेते आनंद मुस्तारे, महेश निकंबे, पक्षाचे जनरल सेक्रेटरी प्रमोद दादा भोसले, युवक प्रदेश सरचिटणीस महेश कुलकर्णी युवक संघटक दत्ता बडगंजी, अल्पसंख्यांक अध्यक्ष समीर भाई शेख, मध्य विधानसभा अध्यक्ष अल्महे राज आबादी राजे, सोशल मीडिया कार अध्यक्ष सोमनाथ शिंदे, संघटित कामगार अध्यक्ष मार्तंड शिंगारे डॉक्टर सेल अध्यक्ष संदीप माने दक्षिण महिला कार्याध्यक्ष कांचन पवार प्रिया पवार घाडगे ताई, प्रज्ञासागर गायकवाड श्याम गांगर्डे, भास्कर अडकी आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी सरपंच ज्ञानेश्वर बिराजदार यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : वागदरी ता.तुळजापूर चे माजी सरपंच तथा जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, पोलिस पाटील बाबूराव बिराजदार यांचे वडील ज्ञानेश्वर भाऊराव बिराजदार यांचे दि.२८ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री ठिक ११.०० वा.दरम्यान वयाच्या ७५ व्या वर्षी हृदय विकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी सुना जावई नातवंडे असा परिवार आहे. माजी सरपंच कै.ज्ञानेश्वर बिराजदार हे सामाजिक जाणीव असलेले कार्यकर्ते होते, त्यांनी ग्रा.प.सदस्य, माजी सरपंच म्हणून गावांतील लोकांची प्रामाणिक पणाने सेवा केली.गावात अनेक विकासात्मक कामे केली आहेत. ते स्टॅम्प रायटर्स म्हणून ही परिचीत होते.

दि.२९ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३०. वा.दरम्यान त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. याप्रसंगी शोकाकुल वातावरणात उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली.

## स्वा. सावरकर विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे, स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय, कोठुरे येथे महात्मा ज्योतिराव फुले पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक सानप एस.डी.होते.तर व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक सावकार एन.एल.संजय निकम, सुधाकर निकम,रोशन दवते, किरण भडांगे एल पी शिंदे, श्रीमती दाणी एस. डी. श्रीम.गायत्री जाधव आदी उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली . व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले असून या वेळी.किरण भडांगे आपल्या मनोगतात म्हणाले की क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी सत्यशोधक समाज संस्थेद्वारे त्यांनी समाज सुधारण्याचे व स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम केले. पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने समाजातील स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी धडपडणाऱ्या महात्मा ज्योतिबांना आज सर्वांनीच आदरांजली वाहिली पाहिजेत. अध्यक्षीय भाषणात .सानप एस. डी. म्हणाले की जनतेने त्यांना महात्मा ही उपाधी बहाल केली . बहुजन समाजाचे अज्ञान ,दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी काही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला.विद्यालय परिवाराच्यावतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले ज्योतिबा फुले यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले दिव्या कोरडे या विद्यार्थ्यांनी नी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदन दिघे याने केले. तर आभार मोगल याने मानले सर्व शिक्षक बंधू-भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थिनी आदींनी परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## श्रीकांत भारतीय यांनी घेतले विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य श्रीकांत भारतीय यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्रींची मूर्ती व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी मंदिर समिती सदस्या शकुंतला नडगिरे उपस्थित होत्या.

## खेळामुळे विद्यार्थ्याचे शारिरीक, बौध्दिक व भावनिक विकास होतो : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्य. व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयाच्या वार्षिक क्रीडासप्ताहाचे उद्‌घाटन संस्थेच्या संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी तर सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी व सीनियर कॉलेज प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी विदयार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी व सांघिक भावना निर्माण व्हावी म्हणून या शाळेने क्रीडासप्ताहाचे उत्तम नियोजन केल्याबद्दल कौतुक करून खेळामुळे विद्यार्थ्याचे शारिरीक, बौध्दिक व भावनिक विकास होतो असे मत व्यक्त केले.



प्रारंभी मशाल प्रज्वलित करून खेळाडुनी उत्कृष्ट संचालनाद्वारे मानवंदना दिली, त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ज्योत व मैदानाचे पूजन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या क्रीडासप्ताहात खो-खो, कबड्डी, क्रिकेट, लंगडी, धावणे, लांब उडी, ऊंच उडी, गोळा फेक, थाळी फेक इत्यादी खेळांचा समावेश करण्यात आला होता.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षक कुमार जाधव, रंजना चव्हाण, दिगंबर जगताप, शरणबसप्पा चानकोटे, सागर मठदेवरू, पूजा कडबगावकर, रवीकिरण दंतकाळे, सिद्रामप्पा पाटील यानी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार प्रदर्शन निशिगंधा कोळी यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात नॅक मानांकन कार्यशाळा**

**अनुदानित महाविद्यालयांनी नॅक चा दर्जा प्राप्त केला पाहिजे**

# विनाअनुदानित महाविद्यालयांनी परिस स्पर्श योजनेचा लाभ घ्यावा : प्राचार्य डॉ. दत्तात्रय सुत्रावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : विनाअनुदानित महाविद्यालयांच्या विकासासाठी राज्य शासनाने परिस स्पर्श योजना कार्यान्वित केली आहे. त्याचा लाभ घेऊन विनाअनुदानित महाविद्यालयांनी ज्ञात मानांकनासाठी आत्मविश्वासाने सामोरे गेले पाहिजे, असे मत प्राचार्य डॉ दत्तात्रेय सुत्रावे यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील आयक्यू एसी विभागाने आयोजित केलेल्या नॅक मानांकन कार्यशाळेत संसाधन व्यक्ती म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ अनमोल वळसंगे तसेच नॅक समन्वयक प्रा. राजशेखर पवार उपस्थित होते.

**नॅक मानांकनासाठी पुरेसा स्टाफ विद्यार्थी केंद्रित कार्यक्रम, महाविद्यालय परिसर, शैक्षणिक व सामाजिक उपक्रम, एन एस एस व क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांचा सहभाग, कार्यालयीन कामकाज, महाविद्यालयाची परीक्षेतील कामगिरी, विद्यार्थ्यांना मिळालेल्या रोजगाराच्या संधी आदी महत्त्वपूर्ण असतात. असे प्राचार्य डॉ दत्तात्रय सुत्रावे यांनी सांगितले.**

पुढे ते म्हणाले की विनाअनुदानित महाविद्यालयाकडे पुरेसा शिक्षक स्टाफ असतो, व्यवस्थापन परिषदेकडून आर्थिक पाठबळ मिळते, शैक्षणिक व समाजाभिमुख कार्यक्रम देखील केले जातात, परंतु ते व्यवस्थित संगणक प्रणाली द्वारे मांडणे आवश्यक असते ही कला आत्मसात केली तर नॅक ला सामोरे जाणे काहीच अवघड नाही.

प्रा. डॉ. अमोल वळसंगे म्हणाले की नॅक बेंगलोर ने आपली जुनी प्रणाली बंद केली असून नवीन प्रणाली कार्यान्वित केली आहे. त्यानुसार महाविद्यालयाचे नॅक मानांकन करणे खूपच सोपे झाले आहे. त्यामुळे अनुदानित महाविद्यालयांनी नॅक चा दर्जा प्राप्त केला पाहिजे.

प्राचार्य भरमशेट्टी म्हणाले की शिक्षकांनी आत्मीयतेने सहकार्य केल्यास नॅक मानांकन करणे शक्य होते. त्यासाठी दृढ आत्मविश्वास आवश्यक आहे.




कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापिका शितल झिंगाडे भस्मे यांनी केले तर आभार प्राध्यापिका मनीषा शिंदे यांनी मानले.

कार्यशाळेत प्रा शिल्पा धूमशेट्टी, प्रा जनाबाई चौधरी, प्रा शितल फटाणे, प्रा विद्या बिराजदार, प्रा प्राची गणाचार्य, प्रा नेहा गंदमल, विठ्ठल यरगल, महेश जोगदे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात...



### आशुतोष चिटणीस केतनभाई शहा यांची बैठक

सोलापूर : फ्लाय ९१ ऐरलाईन्स चे जनरल मॅनेजर सेल्स व चीफ रेव्हेन्यू ऑफिसर आशुतोष चिटणीस हे आज सोलापूर दौऱ्यावर आले असता महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे संचालक व विकास मंच चे सदस्य केतनभाई शहा यांच्या सोबत बैठक झाली व २३ डीसेम्बर रोजी सुरू होणाऱ्या गोवा ते सोलापूर व सोलापूर ते मुंबई तसेच मुंबई ते सोलापूर सोलापूर ते गोवा ह्या विमसनसेवे सम्बधी सविस्तर चर्चा झाली व पुढील नियोजन सम्बधी काय केले पाहिजे हे ठरविण्यात आले.

सोलापूर च्या होटगी रोड विमानतळा चे काम उत्कृष्ट दर्जाचे झाले आहे असे मत व्यक्त केले. सध्या पुणे ते गोवा एक फेरी सुरू आहे व लवकरच शनिवार व रविवारी दोन फेऱ्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या नोव्हेंबर महिन्यामध्ये पुणे ते गोवा सर्व फ्लाईट फुल्ल जात आहेत असे सांगितले. सोलापूर व आजूबाजू जिल्ह्यातून प्रवासी होटगी रोड विमानतळा वरून गोवा व मुंबई येथे जातील व सोलापूरची आर्थिक उलाढाल नक्की वाढेल व नवीन उद्योजक तसेच आय टी क्षेत्र वाढेल असे सांगितले. लवकरच तिकीट विक्री सुरू होईल व व्यापारी उद्योजकाची बैठक घेण्यात येईल तसेच प्रेस कॉन्फरन्स घेतली जाईल. ५ तीर्थक्षेत्राच्या दर्शनास भक्तगण मोठ्या प्रमाणात येतील असा सर्व्हे रिपोर्ट आमच्या कडे आहे असे सांगण्यात आले.

# आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ताकदीने जिंकणार : दीपक आबा साळुंखे पाटील

## दीपकआबा प्रेमी कार्यकर्त्यांची उपस्थिती; सांगोल्यात पराभव चिंतन बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा निवडणुकीत आपला पराभव झाला असला तरी आपण खचून जाणार नाही आपला पराभव हा महाविकास आघाडीनेच केला असून या पुढील काळात आबा तुम्ही मला बांधलं ते तोरण आणि तुम्ही ठरवलं तेच आमचे धोरण असेल असा विश्वास माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला शुक्रवारी दिनांक २९ रोजी सांगोला येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार राहिलेले दीपक आबा साळुंखे पाटील यांनी पराभवाचे चिंतन करण्यासाठी बोलावलेल्या बैठकीला हजारो कार्यकर्ते दीपक आबा प्रेमी कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली.

या बैठकीला उपस्थितीत कार्यकर्त्यांनी संबोधित करताना माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील म्हणाले की मी सत्तेचा सारीपाट घेऊन जन्माला आलो नाही कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव निवडणूक लढवली आणि पराभवाला सुद्धा ताट माननीय समोर गेलो मी माझ्या पूर्वजांची पुण्याई सांगून आणि जातीपातीच्या राजकारणाकडून मते मागितली नाहीत प्रचंड आर्थिक ताकद आणि घाणेरडे राजकारण याला नाकारून ५१ हजार स्वाभिमानी मतदारांनी स्वतःच्या मताची पैशात किंमत न करता माझ्यावर विश्वास ठेवला याच स्वाभिमानी मतदाराच्या जोरावर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपूर्ण टाकलेले लढवणार आणि जिंकणार असा विश्वास ही माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांनी व्यक्त केला जनतेच्या आग्रा खातर आणि केलेल्या कामाच्या जोरावर आपण निवडणूक लढवणे झालेल्या पराभव मान्य करून दुसऱ्या दिवसापासून आपण पुन्हा जनतेच्या सेवेत सक्रिय झाला आहे शेवटच्या श्वासापर्यंत माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचे जात-पाच पक्ष पार्टी न पाहता प्रामाणिकपणे काम करत राहील ३० ते ३५ वर्षांत कधी सत्ता मिळावी म्हणून काम केलेले नाही ३५ वर्षातील फक्त सहा वर्ष विधान परिषदेचा आमदार म्हणून सत्ता मिळवली बाकी कधी सत्तेचा लोक धरला नाही निस्वार्थ सेवा हा साळुंखे पाटील कुटुंबाचा धर्म आहे हीच शिकवण मला स्वर्गीय ह भ प शारदा देवी साळुंखे पाटील यांनी दिली आहे याच विचारावर शेवटच्या श्वासापर्यंत काम करत राहणार असल्याची शेवटी माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांनी नमूद केले तसेच या निवडणुकीत मदत करणाऱ्या सर्व स्वाभिमानी मतदार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्राध्यापक प्रदुम्न चंद्र झपके अभिषेक कांबळे यांच्यासह काँग्रेस पक्षाचा सर्व पदाधिकारी व सहकाऱ्यांचे आवर्जून विशेष आभार मानले

यावेळी ज्येष्ठ नेते तानाजी काका पाटील, आरडी पवार, पियुष साळुंखे, शिवाजी बनकर, शिवाजी कोळेकर, राज मिसाळ संभाजी हरिहर, अजित देवकते, नितीन रणदिवे, विजय इंगोले, भारत नागणे, रफिक काजी, प्राध्यापक अनिल नव्हते, आधी सहप्रमुख कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आबांनी सत्तेत राहावे असे सूर व्यक्त केला मात्र ते बघा साळुंखे पाटील जो निर्णय घेतील त्या निर्णयाची सांगोला विधानसभा मतदारसंघातील दीपक आबा प्रेमी मतदान आणि लाखो अबाल वृद्ध जनता बांधिल राहील असे स्पष्ट केले.

### जय वीरू पुन्हा एकत्र आली पाहिजे

**सांगोला तालुक्याचा सर्वांगीण आणि गतिशील विकास करायचा असेल तर शहाजी बापू पाटील आणि दीपक आबा साळुंखे पाटील हे सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणातील जय वीरू एकत्र आले पाहिजे दोघे एकत्र आले तर समोर तालुक्याचा विकासाची बुलेट ट्रेन आणखी वेगाने धावेल म्हणून दोघांनीही झाले गेले विसरून पुन्हा एकदा एकत्र यावे असा आग्रह चिंतन बैठकीत कार्यकर्त्यांमधून पुढे येत होता.**



### मोठा भाऊ म्हणून बापूंनी जबाबदारी घ्यायला हवी होती

सांगोला तालुक्याची कुटुंब प्रमुख आणि माझा मोठा भाऊ म्हणून शहाजी बापू पाटील यांनी एकत्र राहण्याची जबाबदारी घ्यायला हवी होती मी दोन वर्षांपासून शहाजी बापूंना आपण एकत्र राहू असा आग्रह करत होतो पण त्यासाठी आपल्याला एकत्रितपणे प्रयत्न केले पाहिजेत वरिष्ठ भेटून आपल्या दोघांची भूमिका मांडली पाहिजे म्हणून वारंवार पाठपुरावा करत होतो परंतु मोठा भाऊ म्हणून जबाबदारी पार पाडायला हवी होती असे ते पण आपण स्पष्ट केले.

# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर स्व.आ. भरत नाना भालके याची चतुर्थ पुण्यतिथी साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका, गुरसाळे वेणू नगर, दि.२८ वेणूनगर गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर येथे कारखान्याचे माजी चेअरमन स्व.आ. भारत नाना भालके यांचे चतुर्थ पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन विधीपूर्वक पूजन कारखान्याचे संचालक श्री संभाजी भोसले, व श्री आनंद बापू पाटील यांच्या शुभहस्ते व संचालक मंडळाच्या उपस्थित करण्यात आले.

कारखान्याचे ज्येष्ठ संचालक श्री दिनकर (दाजी) चव्हाण, व शिवसेना गटाचे रणजीत बागल, यांनी मनोगत व्यक्त करून. स्व. भारत नाना भालके यांच्या आठवणींना उजाळा देऊन भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कारखान्याची संचालक श्री जनक भोसले, सुरेश भुसे, सिद्धेश्वर बंडगर, दशरथ जाधव, अशोक घाडगे, तानाजी बागल, माजी नगरसेवक प्रशांत शिंदे, प्रवीण भोसले, कार्यकारी संचालक श्री आर बी पाटील, जनरल मॅनेजर श्री डी आर गायकवाड, तसेच कारखान्याचे ऊस तोडणी वाहतूकदार सभासद कार्यकर्ते ठेकेदार शेतकरी सभासद व कर्मचारी अधिकारी, व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित सर्व संचालक व मान्यवरांनी स्वर्गीय आ. भारत नाना भालके यांना आदरांजली वाहिली.



# भीमा कोरेगाव विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी येणाऱ्या आंबेडकरी अनुयायांना शासनाने चांगल्या सोयी सुविधा देण्यात याव्यात : दादाभाऊ अभंग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनीधी : प्रत्येक वर्षी १ जानेवारीला भीमा- कोरगाव (पेरणे) येथे शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी देश-विदेशातून लाखों आंबेडकरी अनुयायी येतात. या अनुयायांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी शासनाने पुणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय अधिकाऱ्यांची एक कायम स्वरूपी समिती नेमली असून ही समिती शौर्य दिनाचे नियोजन करते. या शौर्य दिनासाठी करोडो रुपयांचा निधी शासनामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा (बार्टी) निधी वापरला जातो. पण हा निधी केवळ कागदावरच वापरला जातो हा निधी प्रत्यक्ष वापरला जात नाही असे अनेक आंबेडकरी अनुयायांचे व संस्था आणि संघटनाचे मत असून प्रत्येक वर्षी १ जानेवारी रोजी आंबेडकरी अनुयायांचे जे हाल होतात ते शौर्य दिनाच्या कार्यक्रमानंतर त्यांचा संताप दिसून येतो. याही वर्षी १ जानेवारी २०२५ रोजी लाखों आंबेडकरी अनुयायी विजयस्तंभाला





मानवंदना देण्यासाठी येणार आहेत. त्यांना कोणत्याही सोयी सुविधांची कमतरता भासू नये म्हणून प्रत्येक वर्षाप्रमाणे भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी मुख्यमंत्री यांना एक निवेदन दिले असून त्या निवेदनात त्यांनी अनेक सोयी-सुविधा पुरविण्यात याव्यात व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी अशी मागणी केली असून त्यात प्रामुख्याने

१) संपूर्ण विजयस्तंभास फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात यावी. २) पोलीस सुरक्षा व्यवस्था तसेच आंबेडकरी अनुयायांना रांगेतून सोडण्यासाठी पोलिस अथवा होम गार्ड (स्त्री-पुरुष) यांची व्यवस्था करावी. ३) पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था, स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये, विजयस्तंभ परिसरात विद्युत रोषणाई व गर्दीचे नियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी उंच माईकसह मनोरे, सी.सी. टिव्ही, पार्किंग व्यवस्था जयस्तंभाच्या जवळपास असणाऱ्या मोकळ्या जागेत करण्यात यावी जेणेकरून महिला, लहान बालके, अपंग व वृद्धांना सोयिस्कर पडेल. ४) भीमा-कोरेगाव विजयस्तंभाऊच्या मालकीच्या परिसरातील ३.८६ आर जागेत पुस्तकांचे स्टॉल, प्रबोधनपर साहित्य व समाजप्रबोधन करणारे स्टॉल इ. सर्व व्यवस्था मोफत करण्यात यावी. ५) भीमा-कोरेगाव विजयस्तंभ परिसरातील जागेत ठिकठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे उभारावीत. ६) पुणे व शिक्रापूर ते पेरणे (भीमा कोरेगाव) व पेरणे (भीमा कोरेगाव) ते पुणे व शिक्रापूर (दर पाच मिनीटांनी) पुणे कॉर्पोरेशन परिवहन बस सेवा महाराष्ट्र राज्य परिवहन बस सेवा प्रत्येक पाच मिनिटाला चालू ठेवावी वरील सोयी सुविधा महाराष्ट्र शासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात याव्यात व यासाठी शासनाने स्वतंत्र निधीची तरतूद करावी किंवा शौर्य दिनानिमित्त होणारा खर्चाचा स्वतंत्र निधी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या संस्थेला अतिरिक्त देण्यात यावा तसेच पार्किंग ही मोठी समस्या असून पार्किंगची व्यवस्था विजयस्तंभापासून खूप लांब ठेवीत असल्याने ज्येष्ठ नागरिक, अपंग, मुले,व स्त्रियांचे मोठ्या प्रमाणात हाल होतात. अनेक वेळा जिल्हाधिकारी यांच्यासमोर ही बाब आणूनही जिल्हा प्रशासन काहीच कार्यवाही करीत नाही. भीमा कोरेगाव विजयस्तंभ येथील शौर्य दिनासाठी मंजूर निधी काटेकोरपणे वापरण्यात यावा व आंबेडकरी अनुयायांना सर्व सोयी सुविधा देण्यात याव्यात अशी मागणी भीमा कोरेगाव विजयसांभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.



**अक्कलकोट तालुक्याचे पाणीदार आमदार माननीय सचिन दादा कल्याण शेट्टी यांचा शिवसेना शहर महिला आघाडी व अक्कलकोट तालुका कामगार सेना यांच्यावतीने सत्कार करण्यात आला शिवसेना शहर महिला आघाडी शहर प्रमुख वैशालीताई हावनूर व कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे शिवसेना शहर महिला आघाडी शहर उपप्रमुख वर्षातामेत्रे माहिती अधिकार अक्कलकोट शहराध्यक्ष समर्थ बिराजदार माहिती अधिकार अक्कलकोट शहर संघटक संदीप राचेटी. व ओम हावनुर**

# माढा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी निधी आणणार आहे : आ. अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्वतः मुख्यमंत्र्यांना भेटून आम्हाला मतदारसंघाचा विकास करण्यासाठी निधी आणणार असल्याची माहिती आमदार अभिजीत पाटील यांनी दिली.

आणि माढा मतदारसंघासाठी गाव भेट दौरे सुरू केले आहेत टेंभुर्णी येथील एका दुकानाच्या उद्घानासाठी आले असता त्यावेळेस त्यांनी पत्रकारांशी बोलताना माढा मतदारसंघाचा गेली तीस वर्षाचा विकास थांबलेला आहे मनाव तसा विकास झालेला आहे तो विकास मी करण्यासाठी कटिबद्ध आहे असे त्यांनी पत्रकारांना संबोधित केले



मला मतदारसंघाचे व्हिजन व मतदार संघाचा विकास करण्यासाठी आपण मुख्यमंत्र्यांना भेटून निधी खेचून आणू अशा प्रकारचे वक्तव्य त्यांनी व्यक्त केले मी माढा मतदारसंघाचा विकास करणार आहे

## संविधान दिनाच्या निमित्ताने ग्राम पंचायत कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन

## एस.के.गायकवाड यांचे प्रतिपादन

# भारतीय संविधानामुळेच देशातील तमाम नागरिकांना उपेक्षित बहुजनांना त्यांचे मानवी हक्क मिळाले : एस.के.गायकवाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : देशातील सामाजिक, राजकीय धार्मिक, शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करून भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच देशातील तमाम नागरिकांना उपेक्षित बहुजनांना त्यांचे मानवी हक्क मिळाले असून देशाची राष्ट्रीय एकात्मता अबाधित आहे, असे प्रतिपादन रिपाइं (आठवले) चे जिल्हा समन्वयक तथा पत्रकार सामाजिक कार्यकर्ते एस.के. गायकवाड यांनी वागदरी ता.तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

वागदरी ता.येथे ग्राम पंचायतीच्या वतीने २६ नोव्हेंबर संविधान दिनाच्या निमित्ताने येथील ग्राम पंचायत कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी एस.के.गायकवाड बोलत होते.

प्रारंभी सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर उपसरपंच सुरेखा भालचंद्र यादव यांच्या शुभहस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक रीत्या संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

यावेळी जेष्ठ कार्यकर्ते सेवा निवृत्त मुख्याध्यापक शिवाजी मिटकर गुरुजी, ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर पाटील, अमोल पवार मिनाक्षीताई बिराजदार, उमेदीच्या सिआरपी विद्याताई बिराजदार, रोजगार सेवक रामसिंग परीहार, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते चंद्रकांत वाघमारे,सादु वाघमारे, ग्रा.प. कर्मचारी ओंकार चव्हाण, आकाश झेंडारे सह ग्रामस्थ उपस्थित होते.

